**भाग-अ**

MHWS090005342023

दाखल दिनांक : १५.०६.२०२३
नोंदणी दिनांक : १५.०६.२०२३
निकाल दिनांक : १४.०५.२०२६
कालावधी : ०२वर्ष १० महिने २९ दिवस

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१), मानोरा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : ज. तु. कोरेगांवकर)

**नियमित फौजदारी खटला क्र. ४८/२०२३** **निशाणी क्र. ३३**

गुन्हयाचा तपशिल
गुन्हा क्र. : ४६९/२०२२
पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, मानोरा तालुका पोलीस स्टेशन, मानोरा. |
| अभियोगपक्षातर्फे | विशेष सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | अमोल युवराज मारोटकार |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. डी. ए. चव्हाण |

**भाग–ब**

**गुन्ह्याचा तपशील**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०३.०९.२०२२ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | ०३.०९.२०२२ |
| दोषारोप दाखल तारीख | १२.०६.२०२३ |
| दोषारोप निश्चित तारीख | १०.०२.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २१.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | १४.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी –कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अमोल युवराज मारोटकार** वयः २५ वर्षे, धंदाः मजुरी रा. ग्राम- कुपटा, ता.मानोरा, जि.वाशिम. | –– | फौ.प्र.सं. कलम ४१ (१) (अ) प्रमाणे नोटीस | भा.दं.वि.चे कलम ३२४, ३२३, प्रमाणे | निर्दोष सोडले | –– | –– |

## भाग–क
## पुरावा तपशिल

अ. – अभियोग पक्ष / सरकारी साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | सदाशिव नारायण मारोटकार | खबरी | निशाणी क्र.२४ |
| २. | फुलवंती सदाशिव मारोटकार | साक्षीदार | निशाणी क्र.२७ |

ब. – आरोपींचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| – | निरंक | –– | –– |

क. – न्यायालयाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| – | निरंक | –– | –– |

## सरकारी / आरोपीचे न्यायालयातील निशाणी दस्तऐवज

अ– सरकारी दस्तऐवज

| अ.क्र | दस्तऐवज यादी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | रिपोर्टवरील अंगठ्याचे निशाण | निशाणी क्र.२५ |
| २. | प्रथम खबर अहवालवरील अंगठ्याचे निशाण | निशाणी क्र.२६ |

ब. आरोपींचे दस्तऐवज

| अ.क्र. | दस्तऐवज यादी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयीन दस्तऐवज

| अ.क्र. | दस्तऐवज यादी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| -- | -- | -- |

मुद्देमाल तपशिल

| अ.क्र. | साहित्य वस्तु | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक १४ मे, २०२६ रोजी )

आरोपी यांना भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ३२३ अन्वये अपराधाकरीता संपरिक्षीत केले आहे.

अभियोगपक्षाच्या मते खटल्याची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे.

२. दिनांक ०३.०९.२०२२ रोजी सायंकाळी ०७:०० वाजताचे सुमारास सदाशिव नारायण मारोटकार (यापुढे त्यांना सोयीकरता 'खबरी' म्हणुन संबोधीत करण्यात येते) व त्यांची पत्नी असे बकऱ्या चारुन घरी आले. त्यावेळी त्यांचा नातु म्हणजे आरोपी हा घरी होता. त्याने खायला काय केले असे खबरी यांच्या पत्नीला धमकावून विचारले. त्यावेळी खबरी व त्यांच्या पत्नीने त्याला समजावतच होते की आरोपी ने त्यांना व त्यांच्या पत्नीला लोटलाट केली व घराचे बाहेर जावून हातात दगड घेवून मुठगोट्याने खबरी यांच्या डोक्यावर मारले. त्यामुळे त्यांचे डोके फुटुन रक्त निघाले. तसेच त्यांच्या पत्नीला सुद्धा आरोपीने थापडा-

बुक्याने नाका तोंडावर मारहाण केली. त्यामुळे तोंडावर जखम होवून रक्त निघाले. त्या अनुषंगाने खबरीने मानोरा पोलिस स्टेशनमध्ये आरोपीविरुद्ध रिपोर्ट दिला.

३. खबर नोंदविल्यानंतर आरोपी विरुध्द मानोरा पोलीस ठाणेत गुन्हा रजिस्टर नं.४६९/२०२२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले. सदरील अपराध सिध्द करण्याकरीता पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्याने आरोपी विरुध्द दोषारोपत्र दाखल केले.

४. आरोपी विरुध्द दोषारोप (निशाणी क्र.२०) निश्चीत केले. त्यातील माहिती आरोपीला त्याच्या बोली भाषेमध्ये वाचुन व समजावून सांगितली. ती त्याला समजली. त्यानंतर त्यांचे प्रतिकथन (निशाणी क्र.२१) नोंदविण्यात आले. आरोपीने प्रतिकथनामध्ये गुन्हा कबुल न करता खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. खटल्यामध्ये आरोपीचे विरुध्द पुरावा न आलेने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदविले नाही.

५. न्यायालयासमोरील पुराव्याचे अवलोकन करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उध्दभवले त्यावर माझा निष्कर्ष मी पुढील कारणमिमांसेसह देत आहे :

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | दिनांक ०३.०९.२०२२ रोजी सायंकाळी ०७:०० वाजण्याचे सुमारास ग्राम–कुपटा, ता.मानोरा, जि.वाशिम येथे आरोपीने खबरी व त्यांच्या पत्नीला मुठगोट्याने व थापडा–बुक्याने मारहाण करुन जखमी केल्याचे आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम ३२४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय ? | ... | नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने खबरी व त्यांच्या पत्नीला मारहाण करुन जखमी केल्याचे आणि त्याद्वारे भा.दं.वि. कलम ३२३ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | ... | नाही |
| ३. | आरोपीं विरुद्ध कुठला गुन्हा सिद्ध झाला आहे काय ? | ..... | नाही |
| ४. | काय आदेश | | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

६. आरोपीवरील आरोप सिध्द करणेकामी अभियोग पक्षाने केवळ दोन साक्षीदार म्हणजेच खबरी सदाशिव नारायण मारोटकार (साक्षीदार क्र.१ ) व खबरीची पत्नी जखमी साक्षीदार (साक्षीदार क्र.२) यांची साक्ष नोंदवली.

## कारणमिमांसा

मुद्दे क्र.१ व २ करीता :

७. खबरी (साक्षीदार क्र.१) सदर प्रकरणातील जखमी साक्षीदार असुन त्यांनी घटनेबाबत काहीही सांगितले नाही. त्यांनी आरोपीसोबत फक्त् शाब्दीक बोलचाल झाली असल्याने त्यांनी रागाच्या भरात आरोपीविरुद्ध तक्रार दिली. तक्रारवर त्यांचा निशाणी अंगठा आहे. परंतु, त्यामधील मजकुराबाबत त्यांना काही माहित नाही. सदर साक्षीदाराने घटनेच्या मुद्यावर अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही. म्हणून विद्वान सरकारी वकिलांनी उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले. परंतु, अभियोग पक्षाचा उपयोगात येईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आणण्यात आलेला नाही. तसेच खबरी (साक्षीदार क्र.१) यांनी उलटतपासणीमध्ये त्यांचे व अरोपीचे न्यायायालयाबाहेर प्रकरण मिटले असल्याने त्यांनी आरोपीविरुद्ध कोणतीही तक्रार शिल्लक राहीली नसल्याचे कथन केले आहे. सदर खबरीची साक्ष अभियोग पक्षाच्या कथनाला दुजोरा देत नसल्यामुळे त्यांची साक्ष आरोपीवरील गुन्हा सिद्ध

करण्यास उपयुक्त ठरत नाही. फुलवंती (साक्षीदार क्र.२) ही खबरीची पत्नी असून या प्रकरणातील महत्वपुर्ण व जखमी साक्षीदार असुन त्यांनी सुद्धा अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यांनी घटनेची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. त्यामुळे त्यांच्या साक्षेवर विश्वास ठेवता येत नाही.

८. अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवून सुद्धा अभियोग पक्ष इतर साक्षीदार, पंच, वैद्यकिय अधिकारी आणि तपासी अधिकारी यांचा पुरावा नोंदवू शकला नाही. त्यामुळे अभियोगपक्ष घटनास्थळ पंचनामा सिद्ध करु शकला नाही. त्यामुळे सदर घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने खबरी व त्यांच्या पत्नीला कथित मारहाण करुन जखमी केल्याची केल्याबाबत अभिलेखावर कोणताही स्पष्ट पुरावा आणण्यात आलेला नाही. करीता मुद्दे क्र.१ व २ चे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविला आहे.

<u>मुद्दा क्र.३ करीता</u> :

९. सबळ पुराव्याअभावी अभियोपक्ष आरोपी विरुध्द असलेला आरोप सिध्द न करु शकल्याने आरोपी विरुध्द कुठलाही गुन्हा सिध्द झाला नाही. करीता आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहेत. करीता मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविला आहे.

<u>मुद्दा क्र.४ करीता</u> :

१०. वरील सर्व विवेचनांवरुन व अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करणे न्यायोचीत ठरते. करीता पुढील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी **अमोल युवराज मारोटकार** यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ३२३ अन्वयेच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तीक जामीन कदबा व बंधपत्र रद्द/अभ्यर्पित करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल एक मुठगोटा मुल्यहिन असल्याने अपिल कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावा.

४. आरोपीने अपिलीय न्यायालयात ज्यावेळी नोटीस काढली जाईल त्यावेळ उपस्थित राहण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ नुसार रक्कम रुपये १५,०००/ चे जामीन बंधपत्र पुढील सहा महिन्याच्या कालावधीकरीता या न्यायालयाकडे द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केले. )

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by JAGDISH TULSIDAS KOREGAONKAR
Date: 2026.05.14 17:29:46 +0530

मानोरा
दिनांक : १४.०५.२०२६

( ज. तु. कोरेगांवकर )
न्यायदंडाधिकारी (प्र.श्रे.),
(न्यायालय क्र.१), मानोरा.

**प्रमाणपत्र**

मी हमी देते की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | कु. आर. के. चव्हाण (ग्रेड-३) |
| न्यायालय | (श्री. ज. तु. कोरेगांवकर )<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानोरा. |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | १४.०५.२०२६ |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | १४.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | १४.०५.२०२६ |